## महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्रमांक-केमाअ-२०१०/१३३८/प्र.क्र.४३२/१०/का.६
सामान्य प्रशासन विभाग,
१९ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. २२०४९५४३
दि. ०७/०१/२०११.

प्रति,

सर्व अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**विषय :** **माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(१) व महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख नियम २००५ च्या अंमलबजावणी संदर्भातील राज्य मुख्य माहिती आयुक्तांच्या सूचना.**

**संदर्भ :** **राज्य मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे क्रमांक - मुमाआ २००९/प्र.क्र.२०/०१, दि. १०/११/२०१० चे पत्र.**

महोदय,

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात पारदर्शकता, गतिमानता, अचूकता व जनतेच्या प्रती उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या उद्देशाने अंमलात आलेला आहे. अधिनियमातील कलम ४ नुसार १७ बाबींवरील माहिती प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांनी प्रसिध्द करणे, सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या नियुक्त्या करणे, सार्वजनिक प्राधिकरणातील सर्व अभिलेख योग्य रितीने सूचीबध्द करणे, त्यांची निर्देश सूची तयार करणे व संगणकीकरण माध्यमातून ते जनतेस उपलब्ध करुन देणे या बाबी सदर अधिनियमान्वये अनिवार्य आहेत. यासंदर्भात शासनाने, शासन परिपत्रक दिनांक १८/६/२००५, ६/८/२००५, १८/८/२००५, ६/९/२००५, २४/९/२००५ व अनेकविध पत्रांन्वये वेळोवेळी सूचना प्रसृत केल्या आहेत. तसेच कलम ४ मधील तरतुदींच्या पूर्ततेची बाब सर्व जिल्हाधिकारी व अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव यांच्या वार्षिक कृती आराखड्यात उद्दिष्ट म्हणून समाविष्ट करण्याच्या सूचनाही शासन पत्र क्रमांक - सीआयए १००९/१७५३/२००९/१०, दिनांक १/९/२००९ अन्वये प्रसृत करण्यात आल्या आहेत. या व्यतिरिक्त सर्व मंत्रालयीन सचिवांना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये कलम ४ ची पूर्तता करुन तद्‌संबंधीची माहिती शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केल्याचे प्रमाणपत्र सामान्य प्रशासन विभागास दिनांक १७ जून २००८ पर्यंत पाठविण्याचे या विभागाच्या क्रमांक - केमाअ २००८/प्र.क्र.१८१/२००८/सहा, दिनांक ३ जून, २००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

उपरोल्लेखित सूचनेस अनुसरुन काही विभागांच्या सचिवांकडून १०० टक्के अनुपालनाची प्रमाणपत्रे प्राप्त झाली आहेत, तर काही विभागांनी केवळ खुद्द प्रशासकीय विभागाची कार्यवाही पूर्ण झाल्याचे प्रमाणित केले असले तरी, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांची माहिती प्रमाणित केलेली नाही. तर काही विभागांकडून माहिती अजिबात प्राप्त झालेली नाही. या अधिनियमाची यशस्विता सर्व प्राधिकरणांनी स्वयंप्रेरणेने कलम ४